# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## ९० वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन (पहिले विश्व नाटय संमेलन) २०१०. न्यू जर्सी, अमेरिका

९० वे अ.भा. मराठी नाटयसंमेलन शनिवार दिनांक २९ मे २०१० ते सोमवार दिनांक ३१ मे २०१० या काळात पहिले विश्व नाटय संमेलन म्हणून न्यू जर्सीतील रॅडीकल सेंटर, अमेरिका येथे घेण्यात आले. या संमेलनासाठी भारतातील रंगकर्मी आणि नाटय रसिकांबरोबरच अमेरिका, फ्रान्स, लंडन येथील बृहन्महाराष्ट्र व मराठी मंडळातील रंगकर्मी आणि नाटय रसिक हजर होते. नाटय संमेलनात 'यु टर्न', 'बेगंम बर्वे' आणि "कट्यार काळजात घुसली" ही नाटके व शतकातील नाटक हा रंगभूमीच्या वाटचालीचा वेध घेणारा कार्यक्रम नामवंत कलाकारांनी सादर केला. अमेरिकेतील एकांकिका स्पर्धेतून निवडण्यात आलेल्या निवडक एकांकिका महोत्सवात सादर झाल्या. तसेच नाट्य परिषदेने महाराष्ट्रात घेतलेल्या एकांकिका स्पर्धेतील तीन विजेत्या एकांकिका संमेलनात सादर झाल्या. संमेलनाध्यक्ष मा. श्री. रामदास कामत यांनीही गाण्याचा सुंदर कार्यक्रम सादर केला.

## अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व कलावंत मेळावा १४ जून २०१० रोजी सायं. ६.३० वा. यशवंत नाटयमंदिर, माटुंगा येथे साजरा करण्यात आला. नाटयक्षेत्रातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केलेल्या एकूण ६८ रंगकर्मींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावर्षीचे जीवनगौरव पुरस्कार श्री. शं.ना. नवरे आणि श्रीमती मंगला संझगिरी यांना देण्यात आले. या सोहळयाला मुंबई येथील नाटयरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. त्यावेळी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

## नाटय लेखन स्पर्धा

९० व्या नाटय संमेलनाचा विशेष उपक्रम म्हणून नाटयलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ६५ स्पर्धक सहभागी झाले. स्पर्धेसाठी आलेल्या एकाहत्तर नाटयसंहितातून परिक्षक मंडळाव्दारे निवडण्यात आलेल्या विजेत्यांना १४ जून रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांची नावे खालील प्रमाणे :

| पारितोषिक | रक्कम | नाटकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|
| व्दितीय क्रमांक | रू. ११,०००/— | 'खून कुणी केला' | न्या. धनंजय देशपांडे |
| तृतीय क्रमांक | रू. ७,०००/- | 'खेळीया' | श्री. पुरूषोत्तम तळेगांवकर |

**<u>उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व रू. १,०००/— प्रत्येकी</u>**

| | |
|---|---|
| 'आळी पाळी गुपचिळी' | श्री. कय्यूम काझी |
| 'साक्षेप' | डॉ. राजीव पाठक |
| 'प्रतिशोध कुणाचा' | श्री. सुरेशचंद्र काळे |
| 'रेशमी गुंता' | समाधी |
| 'आम्ही जातो आमुच्या गावा' | श्री. ह.शि. खरात |